# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 07/09/2020 (सोमवार)

(दुपार)

---

### सर्पदंशामुळे मृत्यु

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर भिलेवाडा येथे दिनांक 05/09/2020 चे 21.00 वा. ते दिनांक 06/09/2020 चे 09.00 वा. दरम्यान फिर्यादीचे वडील/मृतक नामे– चैनसिंग रूपलाल ठाकरे, वय 65 वर्ष, रा. भिलेवाडा हे बंगल्यात चौकीदाराची ड्युटी करीत असतांना त्यांना पोटाला सापाने चावा घेतला. दरम्यान त्यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकामी सरकारी दवाखाना रामटेक येथे नेले असता उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रमेश चैनसिंग ठाकरे, वय 40 वर्ष, रा. भिलेवाडा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पो हवा रावते 9420409454 आहे.

### गळफास लावून मृत्यु

1) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत दादाजी नगर, वार्ड क्र. 4, नागपूर रोड सावनेर येथे दिनांक 05/09/2020 चे 10:00 वा. सुमारास मयुर सुभाषराव अंतुरकर, वय 34 वर्ष, रा. दादाजी नगर वार्ड क्र. 4 सावनेर याने स्वतःच्या राहत्या घरी लोखंडी बारला गळफास घेतल्या स्थितीत आढळून आला. त्यास उपचाराकामी सरकारी दवाखाना सावनेर येथे नेले असता उपचारापुर्वी त्याचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सागर सुभाषराव अंतुरकर, वय 29 वर्ष, रा. दादाजी नगर, वार्ड क्र. 4, सावनेर यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा नारायण बोरकर 9823581297 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा भोजापुर येथे दिनांक 06/09/2020 चे 09:30 वा. ते 14. 00 वा. सुमारास सौ. भारती ईश्वर चव्हाण, वय 45 वर्ष, रा. भोजापुर ही आशा वर्कर म्हणुन भोजापुर येथे काम पाहत होती. दि. 06/09/2020 रोजी यातील फिर्यादी हे भोजापुर शिवारात बोर मध्ये मशीन लावण्याकरीता गेल असता दु. 02.00 वा. सुमारास कामावरून घरी आले. तेव्हा मृतक हिने घराचे दरवाजा आतुन लावले असल्याने फिर्यादी याने जोरजोराने आवाज देवुन व दरवाजा ठोकुन देखील आवाज आला नसल्याने फिर्यादीचा पुतण्या याने घराचे वर चढुन कवेलु काढुन पाहिले असता मृतक हिने घराचे पहिल्याच खोलीत गळफास लावुन मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ईश्वर नारायण चव्हाण, वय 49 वर्ष, रा. भोजापुर यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा ओंकार डहारे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर